महाराष्ट्र वन सेवेमधील अधिकारी व कर्मचारी यांच्या बदल्यांविषयक धोरण.

**महाराष्ट्र शासन**

महसूल व वन विभाग

**शासन शुध्दीपत्रक क्रमांक:-एमएफएस-२०१६/प्र.क्र.१४३ /फ-८**

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,

मंत्रालय, मुंबई ४०० ०३२

दिनांक:- २२ मे, २०१७.

**वाचा :-** १) महसुल व वन विभाग,शासन निर्णय क्र.एमएफएस-२०१४/प्र.क्र.५७ (भाग-२)/फ-८ दि.३१/०१/२०१५

२) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग), नागपूर यांचे पत्र क्र.कक्ष-१०(२)/आस्था/एक/प्र.क्र.९७(१६-१७)/१९२, दि.०५/१०/२०१६.

३) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (कार्मिक), नागपूर यांचे पत्र क्र.मवसे/निसू/०७/१५-१६/ १९६०/कक्ष-९, दि.१४/१०/२०१६.

४) महसुल व वन विभाग,शासन निर्णय क्र. एमएफएस-२०१६/प्र.क्र.१४३ /फ-८, दि.१५/०३/२०१७

५) अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग), नागपूर यांचे पत्र क्र.कक्ष-१०(२)/आस्था/एक/प्र.क्र.९७(१६-१७)/३८७, दि.२४/०३/२०१७.

**प्रस्तावना-**

वन विभागांतर्गत मुख्यत्वे वन, वन्यजीव, जैवविविधता, सामाजिक वनीकरण, पर्यावरण आणि निसर्ग या प्रमुख क्षेत्रातील संरक्षण, संवर्धन, विकास आणि व्यवस्थापनविषयक कामे केली जातात. त्याबरोबरच संशोधन, शिक्षण, प्रशिक्षण, मुल्यांकन, कार्य आयोजना (Working Plan) इत्यादी शाखा या प्रमुख क्षेत्रांना पूरक शाखा म्हणून गणल्या जातात. या सर्व शाखांचे कामकाज एकमेकांशी निगडीत आणि पूरक आहे.

विभागांतर्गत वनरक्षक, वनपाल, वनक्षेत्रपाल, सहायक वनसंरक्षक आणि विभागीय वन अधिकारी यांनी वर नमूद केलेल्या सर्व क्षेत्रात काम करणे अपेक्षित आहे. प्रत्येक शाखेमध्ये काम केल्यास संबंधित अधिकारी आणि कर्मचारी हे अनुभव संपन्न तर होतीलच, पण त्याबरोबरच विविधांगी घटकांचे आणि शाखांचे ज्ञान संपादन करण्याची त्यांना संधी मिळेल. पारंपारिक पध्दतीने कामे न करता कर्मचारी आणि अधिकारी यांना नाविन्यपूर्ण पध्दतीने आणि आधुनिक संकल्पनांचा अवलंब करून कामे करणे अभिप्रेत आहे. विविध शाखांमध्ये सेवा केल्यानंतर त्यातून मिळणाऱ्या ज्ञानाचा आणि समृध्द

अनुभवाचा उपयोग वेगवेगळया क्षेत्रामधील कामे करताना होऊ शकेल. परिणामत: अशा सर्व क्षेत्रातील कामे अधिक गुणवत्तापूर्वक, वेगाबरोबर अचूकपणा साधून (Speed with accuracy) आणि विहित कालमर्यादेत होण्यासाठी अशा अधिकारी व कर्मचारी यांच्या सेवा उपयुक्त ठरतील.

अलीकडच्या काळामध्ये वन विभागाने वर नमूद क्षेत्रामध्ये अतिशय महत्त्वाकांक्षी आणि नाविन्यपूर्ण योजना आणि कार्यक्रम तयार केले असून त्यांची अंमलबजावणी वेगाने सुरू आहे. सबब, वर नमूद केलेल्या संवर्गातील कर्मचारी आणि अधिकाऱ्यांना वेगवेगळया शाखांमध्ये काम करून आपल्या कामाचा आणि व्यक्तीमत्वाचा ठसा उमटविण्यास प्रचंड वाव आहे. त्यातून सर्वसामान्य जनतेला जल, अन्न, उपजिविका आणि पर्यावरण यांच्या सुरक्षिततेच्या दिशेने कार्यक्षम सेवा मिळण्यासाठी खूप मोठा हातभार लागू शकेल. त्या दृष्टीकोनातून वर नमूद संवर्गातील अधिकारी व कर्मचारी यांनी वेगवेगळया शाखांमध्ये काम करणे बंधनकारक करण्याच्यादृष्टीने शासनाच्या दि.१५.०३.२०१७ रोजीच्या शासन निर्णयान्वये बदलीविषयक धोरण निश्चित करण्यात आले होते. परंतु याबाबत अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग), नागपूर यांच्या दि.२४.०३.२०१७ रोजीच्या पत्राच्या अनुषंगाने दि.१५.०३.२०१७ रोजीचा शासन निर्णय याद्वारे रद्द करण्यात येत असून खालीलप्रमाणे सुधारीत धोरण निश्चित करण्यात येत आहे :-

**शासन निर्णय:-**

बदली विषयक कायदा २००६ मधील तरतुदीनुसार एखाद्या पदावर सर्वसाधारणपणे ३ वर्षाचा कालावधी विहित करण्यात आला आहे. त्याचबरोबर बदली विषयक अपवादात्मक आणि विशेष तरतुदी या कायद्यांतर्गत करण्यात आल्या आहेत. वर नमूद पार्श्वभूमी व बदलीविषयक कायद्यातील नमूद तरतूदी विचारात घेवून वनरक्षक, वनपाल, वनक्षेत्रपाल व सहायक वनसंरक्षक या संवर्गातील अधिकारी व कर्मचारी यांच्या बदली विषयक धोरण खालीलप्रमाणे निश्चित करण्यात येत आहे :-

I) वन विभागात वन व वन्यजीव संरक्षण, सर्वेक्षण, संवर्धन, प्रशिक्षण व संशोधन यासाठी खालील ४ महत्वाच्या शाखा आहेत:-

| अ. क्र. | वन विभागाच्या शाखा |
|---|---|
| १ | प्रादेशिक |
| २ | वन्यजीव |
| ३ | सामाजिक वनीकरण |
| ४ | संशोधन/ प्रशिक्षण/ कार्य आयोजना/ मुल्यांकन व इतर (जकांस / डेपो / फिरते पथक /संरक्षण व अतिक्रमन निर्मूलन/ तांत्रिक सहाय्यक / कोर्ट केस / मुख्यालय / भरीव वनीकरण कार्यक्रम /लॉगींग युनिट / पश्चिम विकास घाट / रोहयो, इ. विशेष सेवा) |

II) सहायक वनसंरक्षक / वनक्षेत्रपाल/ वनपाल/ वनरक्षक संवर्गातील बदलीस पात्र असणाऱ्या अधिकाऱ्यांची तसेच रिक्त असणारी पदे व अधिकाऱ्यांच्या बदलीने रिक्त होणाऱ्या पदांची यादी तयार करावी. **उपरोक्त नमूद शाखेतील रिक्त पदांच्या प्रमाणात त्या शाखेतील पदे भरण्यात यावीत.**

III) त्याचबरोबर सहायक वनसंरक्षक / वनक्षेत्रपाल या संवर्गासाठी पदोन्नतीनंतर विभागीय महसूली संवर्ग लागू असल्याने संबंधित महसूली विभागात पदोन्नतीनंतर पदस्थापना देताना वर नमूद केल्याप्रमाणेच कार्यवाही करण्यात यावी.

IV) उपरोक्त नमूद शाखेत विहित प्रमाणात अधिकारी/कर्मचारी यांची पदस्थापना करताना खालीलप्रमाणे कार्यवाही करण्यात यावी :-

**अ) <u>सहायक वनसंरक्षक व वनक्षेत्रपाल</u>**

१. वनक्षेत्रपाल व सहायक वनसंरक्षक संवर्गात सरळसेवेने नियुक्त झालेल्या व प्रशिक्षण पूर्ण करणाऱ्या अधिकाऱ्यांची प्रथम पदस्थापना ही शक्यतो पदाच्या उपलब्धतेनुसार प्रादेशिक वन विभाग/ वन्यजीव विभागात करण्यात यावी.

२. प्रादेशिक वन विभागात ३ वर्षांची सेवा केल्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांची पुढील पदस्थापना ही वन्यजीव विभाग किंवा सामाजिक वनीकरण विभागात करण्यात यावी. जर या विभागात पदांची उपलब्धता नसेल तर संशोधन, शिक्षण, प्रशिक्षण, मुल्यांकन, कार्य आयोजना (Working Plan) किंवा इतर शाखेत पदस्थापना देण्यात यावी.

३. वन्यजीव विभागात ३ वर्षांची सेवा केल्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांची पुढील पदस्थापना ही प्रादेशिक वन विभाग किंवा सामाजिक वनीकरण विभागात करण्यात यावी. जर या विभागात पदांची उपलब्धता नसेल तर संशोधन, शिक्षण, प्रशिक्षण, मुल्यांकन, कार्य आयोजना (Working Plan) किंवा इतर शाखेत पदस्थापना देण्यात यावी.

४. सामाजिक वनीकरण विभागात ३ वर्षांची सेवा केल्यानंतर संबंधित अधिकाऱ्यांची पुढील पदस्थापना ही प्रादेशिक वन विभाग किंवा वन्यजीव विभागात करण्यात यावी. जर या विभागात पदांची उपलब्धता नसेल तर संशोधन, शिक्षण,

प्रशिक्षण, मुल्यांकन, कार्य आयोजना (Working Plan) किंवा इतर शाखेत पदस्थापना देण्यात यावी.

५. वनविभागाचे संशोधन, शिक्षण, प्रशिक्षण, मुल्यांकन, कार्य आयोजना (Working Plan) व इतर शाखेतील पदावर पदावधी पूर्ण झाल्यावर त्यांची पुढील पदस्थापना प्रादेशिक वनक्षेत्रात किंवा वन्यजीव शाखेत किंवा सामाजिक वनीकरण शाखेत पदाच्या उपलब्धतेनुसार करण्यात यावी.

६. त्याचबरोबर एखाद्या अधिकारी/कर्मचारी यांनी प्रादेशिक, वन्यजीव आणि सामाजिक वनीकरण या क्षेत्राव्यतिरिक्त संशोधन, शिक्षण, प्रशिक्षण, मुल्यांकन, कार्य आयोजना (Working Plan) या शाखात काम करण्याची इच्छा प्रदर्शित केल्यास त्यांना प्राधान्याने त्या ठिकाणी नेमणूक देण्यात यावी.

७. सक्षम प्राधिकाऱ्याने बदलीने पदस्थापनेसाठी प्रस्ताव तयार करताना संबंधित अधिकारी व कर्मचारी यांचा सविस्तर सेवा तपशिल पाहून वर नमूद १, २, ३, ४ आणि ५ येथे नमूद केलेल्या क्रमानेच पदस्थापना कराव्यात.

८. जर वर नमूद केलेल्या क्रमवारीनुसार पदस्थापना करण्यास खरोखरच काही अडचणी असल्यास सक्षम प्राधिकारी हे त्याबाबतची लेखी कारणे, संबंधित अधिकारी आणि कर्मचारी यांच्या बदलीने पदस्थापना करण्याच्या आदेशामध्ये सविस्तरपणे नोंदवतील.

९. सहायक वनसंरक्षक / वनक्षेत्रपाल अधिकारी संवर्गातील पदोन्नतीनंतर पदस्थापना देतानासुद्धा संबधित महसूली विभागात उपरोक्त निकषाच्या अनुषंगानेच पदस्थापना करण्यात यावी.

ब) <u>**वनपाल व वनरक्षक संवर्गासाठीचे बदलीबाबतचे धोरण**</u> :-

१. <u>**वनपाल**</u> :- वनपालाचे पद गट-क संवर्गाचे असून क्षेत्रिय वनवृत्त स्तरावरील आहे. वनपालांची बिंदूनामावली वृत्तस्तरावर ठेवण्यात येते. त्यानुसार सर्व वनपालांची बदली व पदस्थापना सामान्यत: क्षेत्रिय वनवृत्ताचे आस्थापनावर असलेल्या शाखेमध्येच केली जाते. राज्यामध्ये वनपालांची एकूण ३०२५ ऐवढी पदे मंजूर असून त्यापैकी प्रादेशिक विभागामध्ये २१०० पदे, वन्यजीव विभागामध्ये ३३३ पदे व इतर शाखेमध्ये ५९२ पदे मंजूर आहेत. वन्यजीव व इतर

शाखेचे पद सर्व वनवृत्तात सारख्या प्रमाणात उपलब्ध नाहीत. अशा स्थितीत खालीलप्रमाणे नियम करण्यात येत आहेत :-

i) वनपाल पदावर नियुक्ती / पदोन्नती झाल्यावर, त्यांचे वय ५० वर्षापेक्षा कमी असेल तर प्रथम पदस्थापना देतांना वन्यजीव शाखेला प्राधान्य देण्यात यावे. तसेच ५० वर्षापेक्षा अधिक वय असणाऱ्यांना प्रादेशिक/ सामाजिक वनीकरण/ इतर विभागात पदाच्या उपलब्धतेनुसार पदस्थापना द्यावी. परंतु ५० वर्षापेक्षा वय असणाऱ्यांना प्रादेशिक वन विभागात पदस्थापना करणे बंधनकारक राहणार नाही.

ii) वन्यजीव / सामाजिक वनीकरण / इतर शाखेमध्ये एक पदावधी पूर्ण केल्यावर प्रादेशिक वनविभागात बदली करण्यात यावी.

iii) एका वनवृत्तातील एका प्रादेशिक वनविभागामध्ये सलग अधिकतम दोन पदावधी पूर्ण करून त्यानंतर वनवृत्ताचे आस्थापनावरील इतर शाखामध्ये जसे वन्यजीव / सामाजिक वनीकरण / कार्य-आयोजना / संशोधन / मुल्यांकन/ इतर शाखा येथे बदली करणे आवश्यक राहील. जर इतर शाखेमध्ये पद उपलब्ध नसेल किंवा काही अपवादात्मक स्थिती उदभवली तर बदली करण्यास सक्षम असलेल्या प्राधिकरणाकडुन याबाबत लेखी कारणे नमूद करून दुसऱ्या प्रादेशिक वनविभागात बदली करू शकेल.

जर प्रशासकीय कारणास्तव एखाद्या वनपालाची एकाच प्रादेशिक वनविभागात दोन पेक्षा जास्त पदावधी ठेवण्याची गरज असेल तर अशा स्थितीमध्ये बदली करण्यास सक्षम असलेल्या प्राधिकरणाने त्यांचे लगतचे वरिष्ठ बदलीस सक्षम अधिकारी यांच्या पुर्वपरवानगीनेच त्या वनपालाची त्याच वनविभागामध्ये बदली करता येईल.

iv) पदोन्नतीनंतर तपासणी नाका व आरागिरणी तपासणी या पदावर फक्त एकच पदावधीची सेवा करता येईल.

v) एखाद्या शाखेमधील कामामध्ये पारंगत / प्राविण्य प्राप्त असलेल्या वनपालाची जर इच्छा असेल आणि प्रशासकीय आवश्यकता असेल तर अशा वनपालास त्या शाखेमध्ये पुढील कमाल ३ वर्षांच्या कालावधीसाठी कार्यरत ठेवता येईल. तदनंतर त्याची बदली अन्य शाखेत करणे बंधनकारक राहील.

परंतु असे की, एखाद्या कार्यरत वनपालाची वन्यजीव, कार्य-आयोजना, मुल्यांकन, संशोधन किंवा इतर शाखेमध्ये काम करण्याची आवड व सहमती असेल तसेच तो त्याबाबतचे प्राविण्य धारण करीत असेल तर, अशा वनपालाची बदली व पदोन्नतीने पदस्थापना प्राधान्याने प्रशासकीय आवश्यकतेनुसार इतर संबंधित शाखेमध्ये करता येईल.

२. <u>वनरक्षक</u> :- वनरक्षकाचे पद गट-क संवर्गाचे असून जिल्हास्तरीय / क्षेत्रिय वनविभागस्तरीय आहे. वनरक्षकांची बिंदूनामावली जिल्हानिहाय / क्षेत्रिय वनविभागनिहाय ठेवली जाते व वनरक्षक पदाचे नियुक्ती प्राधिकारी हे उपवनसंरक्षक प्रादेशिक आहेत. त्यानुसार सर्व वनरक्षकांची बदली व पदस्थापना सामान्यतः जिल्हा / क्षेत्रिय वनविभागाचे आस्थापनावर असलेल्या शाखेमध्येच केल्या जाते. राज्यामध्ये वनरक्षकांची एकूण ९४६१ ऐवढी पदे मंजूर असून त्यापैकी प्रादेशिक विभागामध्ये ७३४७ पदे, वन्यजीव विभागामध्ये १७३६ पदे व इतर शाखेमध्ये ३७८ पदे मंजूर आहेत. वन्यजीव व इतर शाखेचे पद सर्व जिल्ह्यात सारखे उपलब्ध नाही. अशा स्थितीत खालीलप्रमाणे नियम करण्यात येत आहेत :-

i) वनरक्षक पदावर नियुक्ती झाल्यावर प्रथम नियुक्ती देतांना वन्यजीव शाखेला प्राधान्य देण्यात यावे.

ii) वन्यजीव / सामाजिक वनीकरण / इतर शाखेमध्ये एक पदावधी पूर्ण केल्यावर प्रादेशिक वनविभागात बदली करण्यात यावी.

iii) एका प्रादेशिक वनपरिक्षेत्रात सलग अधिकतम दोन पदावधी पूर्ण करून त्यानंतर वनविभागाचे आस्थापनावरील इतर शाखामध्ये जसे वन्यजीव / सामाजिक वनीकरण / कार्य-आयोजना / संशोधन / मुल्यांकन येथे बदली आवश्यक राहील. जर इतर शाखेमध्ये पद उपलब्ध नसेल किंवा काही अपवादात्मक स्थिती उद्भवली तर बदली करण्यास सक्षम असलेल्या प्राधिकरणाकडून याबाबत लेखी कारणे नमुद करून दुसऱ्या प्रादेशिक वनपरिक्षेत्रात वन्यजीव/ सामाजिक वनीकरण/ कार्य आयोजना/ संशोधन/ मुल्यांकन शाखेत बदली करता येईल.

iv) जर प्रशासकीय कारणास्तव एखाद्या वनरक्षकाची एकाच प्रादेशिक परिक्षेत्रात दोन पेक्षा जास्त पदावधी ठेवण्याची गरज असेल तर अशा स्थितीमध्ये बदली करण्यास सक्षम असलेल्या प्राधिकरणाने त्यांचे लगतचे वरिष्ठ बदलीस सक्षम प्राधिकारी यांच्या पुर्व परवानगीनेच त्या वनरक्षकाची त्याच वनपरिक्षेत्रामध्ये बदली करता

येईल. याबाबत संबंधिताच्या आदेशात वरिष्ठ प्राधिकाऱ्यांची मान्यता घेतल्याबाबत स्पष्टपणे नमूद करणे आवश्यक राहील.

v) तपासणी नाका या पदावर फक्त एकच पदावधीची सेवा करता येईल.

vi) एखाद्या शाखेमधील कामामध्ये पारंगत / प्राविण्यप्राप्त असलेल्या वनरक्षकाची जर इच्छा असेल आणि प्रशासकीय आवश्यकता असेल तर अशा वनरक्षकास त्या शाखेमध्ये पुढील कमाल ३ वर्षाच्या कालावधीसाठी कार्यरत ठेवता येईल. तदनंतर अशा अधिकाऱ्यांची इतर शाखेत बदली करणे बंधनकारक राहील.

vii) प्रादेशिक शाखेत कार्यरत असलेल्या एखाद्या वनरक्षकाची वन्यजीव, कार्य-आयोजना, मुल्यांकन, संशोधन किंवा इतर शाखेमध्ये काम करण्याची आवड व सहमती असेल, तसेच तो त्याबाबतचे प्राविण्य धारण करीत असेल तर, अशा वनरक्षकाची बदली व पदोन्नतीने पदस्थापना प्राधान्याने प्रशासकीय आवश्यकते नुसार इतर संबंधित शाखेमध्ये करता येईल.

२. सद्यस्थितीत या शासन निर्णयातील तरतुदीनुसार वर नमूद अधिकारी आणि कर्मचारी यांच्या बदलीने पदस्थापनेचे प्रस्ताव बदली विषयक सक्षम प्राधिकाऱ्याने विचारात घ्यावेत. संबंधित संवर्गाच्या सेवा प्रवेश नियमात त्यानुसार आवश्यक त्या सुधारणा यथावकाश करण्यात येतील. तोपर्यंत प्रस्तुत शासन निर्णयातील प्रशासकीय आदेशानुसार कार्यवाही करण्यात यावी.

३. महसुल व वन विभागाचा शासन निर्णय क्रं.एमएफएस-२०१४/प्र.क्र.५७ (भाग-२)/फ-८ दि.३१/०१/२०१५ अन्वये महाराष्ट्र वनसेवेतील अधिका-यांची बदल्या व पदस्थापनेबाबत मार्गदर्शक तत्वे निर्गमित केली आहेत. सबब उपरोक्त नमूद पध्दतीचा अवलंब करताना सदर दि.३१/०१/२०१५ मधील मार्गदर्शक तत्वे, बदली अधिनियमातील तरतुदी व तसेच सामान्य प्रशासन विभागाच्या महसुली विभाग वाटपासंदर्भातील दि.२८/०४/२०१५ व दि.१६/०७/२०१५ रोजीच्या अधिसुचनेतील तरतुदीसुध्दा विचारात घेण्यात याव्यात.

४. वन विभागातील अधिकारी / कर्मचारी यांचेमध्ये उत्कृष्ठ कार्य करण्याबद्दल निकोप स्पर्धा होण्यासाठी वन / वन्यजीव संरक्षण, वन / वन्यजीव व्यवस्थापन, नाविण्यपूर्ण / इतर विकासात्मक / पूरक कार्य व वन विस्तार या कामात उत्कृष्ट कार्य केल्याबद्दल ज्या अधिकारी / कर्मचारी यांनी राज्यस्तरीय सुवर्ण किंवा रजत पदक प्राप्त केलेले आहेत, अशा अधिकारी / कर्मचा-यांना सेवा काळात एकदा त्यांचे

पसंतीच्या शाखेत किंवा पसंतीचे ठिकाणी पदाच्या उपलब्धतेनुसार सामान्य प्रशासन विभागाची महसुली विभाग वाटपासंदर्भातील अधिसुचना क्रं.एसआरव्ही-२०१५/प्र.क्र.१५६/कार्या-१२ दि.२८/०४/२०१५ व दि.१६/०७/२०१५ रोजीच्या अधिसुचनेतील तरतुदीच्या अधीन राहून पदस्थापना करण्यात यावी.

५. प्रादेशिक शाखा सोडून इतर शाखेत पद उपलब्ध नसणे किंवा विशेष परिस्थिती निर्माण होण्याचे प्रसंग येऊ शकतात. अशावेळी ज्या संवर्गासाठी बदल्यांचे अधिकार क्षेत्रीय प्राधिका-यांना दिले आहेत, अशा संवर्गासाठी संबंधित प्राधिकरणाकडून याबाबत कारणे नमूद करुन बदली करण्यास सक्षम असलेल्या लगतच्या वरीष्ठ प्राधिकाऱ्याची लेखी पुर्वसंमती घेऊन त्याप्रमाणे बदली आदेशात स्पष्टपणे नमूद करण्यात यावे.

६. वर नमूद केल्याप्रमाणे अधिकारी व कर्मचारी यांचे बदलीने/ पदोन्नतीने पदस्थापना करण्याबाबतचे प्रस्ताव विचारात घेताना सदर आदेशात नमूद केलेल्या विशेष बाबी वगळता इतर कोणत्याही परिस्थितीत त्यामध्ये अपवाद किंवा खास बाब म्हणून विचार करू नये. अधिकारी व कर्मचारी यांचा अशा पदस्थापनेमध्ये वर नमूद केलेल्या निकषांविरूध्द पदस्थापना केल्याचे निदर्शनास आल्यास आणि चौकशीमध्ये त्यामध्ये तथ्य आढळल्यास, संबंधित जबाबदार अधिकारी व कर्मचारी यांच्याविरूध्द शिस्तभंगाची कार्यवाही करण्यात येईल, याची कृपया नोंद घेण्यात यावी.

या शासन निर्णयातील तरतुदी निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून तात्काळ अंमलात येतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

22/5/015

(डी. एल. थोरात)
सह सचिव (वने)
महसूल व वन विभाग

प्रत :-

१) मा. मुख्य सचिव.
२) मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) प्रधान सचिव (सेवा), साप्रवि, मंत्रालय.
४) प्रधान मुख्य वनसंरक्षक (वन बल प्रमुख), महाराष्ट्र राज्य,नागपूर.
५) प्रधान मुख्य वनसंरक्षक, सामाजिक वनीकरण, पुणे.
६) सर्व प्रधान मुख्य वनसंरक्षक.